# जिल्हा निर्यात प्रचलन समिती सभा दि. १३.०७.२०२३ चे इतिवृत्त

जिल्हा निर्यात कार्यबल समितीची सभा मा.डॉ.श्री.विजय राठोड (भाप्रसे), यांचे अध्यक्षतेखाली दि.१३.०७.२०२३ रोजी जिल्हाधिकारी कार्यालय सभागृह, जालना येथे संपन्न झाली. सभेच्या सुरवातीस महाव्यवस्थापक, जिल्हा उद्योग केंद्र, जालना यांनी सर्व उपस्थित सदस्यांचे स्वागत करुन सभेस सुरवात केली.

मा.जिल्हाधिकारी तथा अध्यक्ष, जिल्हा निर्यात प्रचलन समिती यांचे अध्यक्षतेखाली स्थापन करण्यात आलेल्या जिल्हा निर्यात प्रचलन समिती मध्ये जिल्हयाच्या निर्यातीबाबत सदस्य सचिव यांनी माहिती दिली. जालना जिल्हयाचे महाराष्ट्राच्या तुलनेत एकूण निर्यात १८०२.३९ करोड असून राज्याच्या तुलनेत जालना जिल्याचा हिस्सा ०.३३% एवढा आहे असे सांगितले. त्यामुळे जिल्हयाची निर्यात किमान २.०० % पर्यंत वाढविण्याबाबत प्रयत्न करणे आवश्यक असल्याचे नमुद केले.

मा.विकास आयुक्त (उद्योग) मुंबई यांचे अर्धशासकीय पत्र क्र.१०५/दि.०८.०५.२०२३ नुसार जिल्हयातील निर्यात वाढविण्याकरीता करावयाच्या कार्यवाहीबाबत कळविल्यानुसार खालील प्रमाणे १० मुद्यांवर चर्चा करण्यात आली.

१.जिल्हयातील निर्यात दर ०.३३% असुन तो वाढविण्यासाठी एक्स्पोर्ट स्ट्रॅटेजीक प्लान, सॉफ्ट ॲण्ड इंटरवेशन कार्यक्रम तयार करुन जिल्हयातील किमान दोन डीजीट मध्ये होण्यासाठी प्रयत्न करावेत. त्याअनुषंगाने जिल्हयातील होणारी निर्यात ही जिल्हयातून थेट न होता मुंबई येथील एक्स्पोर्ट हाऊस द्वारे केली जाते. त्यामुळे सदर होणारी निर्यात ही जिल्हयाच्या निर्यातीमध्ये गणना होत नाही. जर जालना जिल्हयामधील प्रस्तावित ड्रायपोर्ट चे काम लवकर झाल्यास तेथून थेट जवाहरलाल नेहरु पोर्ट मुंबई येथे जिल्हयातील निर्यातदारांचा माल पाठविणे शक्य होईल. व जिल्हयाचा निर्यातदर दोन डीजीट मध्ये होईल. असे श्री सुनिल रायटठ्ठा यांनी सांगितले. यावर मा. जिल्हाधिकारी यांनी असे सांगितले की, ड्रायपोटच्या प्रगतीबाबत आढावा बैठक घेण्यात आली असुन इंफ्रास्ट्रक्चर देखभाल व ओपरेट यांचे टेंडर प्रक्रिया सुरु आहे. व माहे सप्टेंबर-२०२३ अखेर ड्रायपोर्टचा पहिला टप्पा निर्यातीकरीता लागणाऱ्या सर्व सोयीसह कार्यान्वित होईल. त्याचा लाभा जिल्हयातील सर्व निर्यातदारांनी घ्यावा असे सूचित केले.

२. एक्स्पोर्ट स्ट्रॅटेजीक प्लान नुसार दरमहा जिल्हयातून होणारी विविध उत्पादने निर्याती बाबतची माहिती कस्टम विभागाकडुन गोळा करावी असे मा. जिल्हाधिकारी यांनी सुचित केले.

३.जिल्हयातील निर्यातक्षम उत्पादन निर्यात करण्यासाठी विविध देशातील आयातदारांच्या मागणीनुसार उत्पादन निर्यात करावीत. त्यानुषंगाने जिल्हयामध्ये बीज उत्पादने मोटया प्रमाणात असून त्यामध्ये निर्यातीस मोटया प्रमाणावर वाव आहे. तसेच थायलंड, म्यानमार या देशामध्ये टोमॅटो निर्यातीस सद्यस्थितीस मोटा वाव असल्याचे श्री. समीर अग्रवाल यांनी सांगितले.

४.जिल्हयातील निर्यातक्षम मालाची गुणवत्ता वाढवण्यासाठी ब्रँडींग, पॅकेजींग, मार्केटींग करीता सर्टिफिकेशन आवश्यक असल्याने जिल्हयातील आयसीटी संस्था, मोसंबी संशोधन केंद्र, बदनापूर व जेईएस कॉलेज या संस्थेबरोबर सामंजस्य करार करण्यात येत आहेत अशी माहिती महाव्यवस्थापकांनी दिली.

५.जिल्हयातील निर्यातदारांना निर्यातीबाबत विविध प्रकाराची माहिती होण्यासाठी प्रबोधन शिबीरे, कार्यशाळा दर तीन महिन्यास आयोजित करण्याबाबत मा.जिल्हाधिकारी यांनी सूचना दिल्या. त्यानुसार अपेडा ही संस्था तसेच डीजीएफटी मार्फत सदर कार्यक्रम घेण्याकरीता त्यांना कळविण्यात यावे असे ठरले. श्री.सुनिल रायठठ्ठा यांनी प्रस्तावित आराखडयात सादर केल्यानुसार निर्यातीबाबत उद्योजकांना व भावी उद्योजकांना काही माहिती व्हावी यासाठी ईपीसी च्या माध्यमातून जागरुकता होणे गरजेचे आहे असे सूचित केले. त्यानुषंगाने जागतिक स्तरावरील सन २०२३-२४ मध्ये आयोजित होणारी निर्यात प्रदर्शनांचे वेळापत्रक जिल्हयातील निर्यातदार/उद्योजकांना ईमेलद्वारे कळविण्यात आले असुन त्यामध्ये निर्यातदारांनी सहभाग घ्यावा असे महाव्यवस्थापक जि. उ. के. जालना यांनी सांगितले.

६.बायर सेलर मिट ईईपीसी/ डीजीएफटी या संस्थेमार्फत आयोजित करण्याबाबत ठरले.

७. जिल्हयामध्ये निर्यातक्षम खाद्य व शेत मालाची बाहेर देशातील मागणीप्रमाणे सर्टिफिकेशन करण्यासाठी फायटो सॅनिटरी, केमीकल टेस्टींग इ.करीता आयसीटी जालना या संस्थेकडे यासर्व पायाभूत सुविधा उपलब्ध असल्याने त्यांना सर्टिफिकेशनची परवानगी देण्याबाबत कार्यवाही व्हावी अशी मागणी निर्यातदारानी केली. मा. अध्यक्ष यांनी सदर संस्थेमार्फत अजुन कोणत्या टेस्टींग सुविधा देण्यात येवु शकतात यावर करुन अवगत करण्यात येईल असे सुचित केले.

८.जिल्हयातील निर्यातदारांच्या अडचणी सोडविण्यासाठी ईईपीसी, डीजीएफटी यांचे मार्फत जिल्हास्तरावर सुविधा उपलब्ध करुन देण्यात यावी.

९.जिल्हास्तरावर दरमहा जिल्हास्तरीय निर्यात प्रचलन समितीची सभा आयोजित करण्यात येत आहे.

१०.जिल्हयातील निर्यातदार उद्योजकांना त्यांची मालाची गुणवत्ता वाढविण्यासाठी क्वालीटी, सेफ्टी स्टॅण्डर्ड व विविध प्रकाराच्या टेक्नॉलॉजीचा वापर करावा.

नाशवंत माल निर्यातकरण्यासाठी आवश्यक असलेले सर्टिफिकेशन व इतर बाबींची निर्यातदारांना माहिती नाही. त्याकरीता फायटो सॅनिटरी, केमीकल टेस्टींग इ.करीता आयसीटी जालना या संस्थेकडे यासर्व

पायाभूत सुविधा उपलब्ध असल्याने त्यांना सर्टिफिकेशनची परवानगी देण्याबाबत कार्यवाही व्हावी अशी मागणी निर्यातदारानी केली.

औरंगाबाद विमानतळावर कार्गो हब मुजुरी प्राप्त असुन अद्याप सदर सुविधा सुरु नाही जर सुविधा सुरु झाल्यास ापीत त्याचा मोठा फायदा निर्यातदारांना होईल असे निर्यातदारांनी सभेत सांगितले. तसेच कार्गो हब जवळ कोल्ड स्टोरेजची सोय असल्यास नाशवंत माल त्या ठिकाणी साठवणूक करुन त्याची क्वालीटी राखता येवू शकेल व बाजारातील मागणी प्रमाणे सदर माल निर्यात करता येवू शकेल अशी चर्चा झाली.

यावर मा.जिल्हाधिकारी यांनी सांगितले की, जिल्हयात निर्यातीस चालना मिळावी व त्यात वाढ होण्याकरीता निश्चित असा कालबध्द कार्यक्रम राबविण्यात यावा. यामध्ये उद्योजकांच्या मागणीनुसार निर्यात मालाच्या अनुषंगाने स्वंतत्र असे मार्गदर्शनपर सेमिनार आयोजित करावेत. अपेडा या संस्थेस सदर सेमीनार मध्ये सक्रीय सहभाग नोंदविण्याबाबत त्यांना कळविण्यात यावे. तसेच औरंगाबाद विमानतळावर जिल्हयातील निर्यातक्षम मालाची जाहीरात करण्यासाठी डिस्प्ले बोर्ड निर्यातदार उद्योजकांनी लावावा. जेणेकरुन विमानतळावर येणाऱ्या देशी विदेशी पर्यटकांना याबाबत जिल्हयातील निर्यातक्षम मालाची माहिती होवून ते निर्यातदार घटकांशी प्रत्यक्ष संपर्क साधतील.

सभेस उपस्थित सर्व सदस्यांचे आभार मानून सभा संपन्न झाल्याचे घोषित करण्यात आले.

महाव्यवस्थापक तथा सचिव,
जिल्हास्तरीय निर्यात प्रचलन समिती,जालना

जिल्हाधिकारी तथा अध्यक्ष,
जिल्हास्तरीय निर्यात प्रचलन समिती,जालना